**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर**

ग्राहक तक्रार क्र. ०५/२००९/ दिनांक :

श्री. गोपाल जायाप्पा करे, अर्जदार
रा. करेवाडी, ता. जत, जि. सांगली

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि., संवसु मंडळ कार्यालय,
विश्रामबाग , सांगली. विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ,
जिल्हा सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
महावितरण, उप विभाग, संख, जि. सांगली

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : १९.०५.२००९

सदरील तक्रार अर्ज हा अर्जदार श्री. गोपाल जा. करे यांनी त्यांना शेतीपंपासाठी वीज जोडणी मिळणे संबंधात केलेला आहे. त्यांचे अर्जाप्रमाणे ता. २०.१.२००० रोजी कोटेशनची रक्कम रु. २७२०/– वि.प.कडे भरण्यात आलेली आहे. त्यांना विद्युत पुरवठा मिळाला नसल्याने ता. ७.६.२००८ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार अर्ज केलेला होता. कक्षाने दिलेल्या आदेशाप्रमाणे नवीन चाचणी अहवाल अर्जदाराने दिला होता. परंतु सदरील अर्जदाराला ता. ७.१.२००९ पर्यंत त्यांना वीज पुरवठा करण्यात आलेला नाही. सबब वीज पुरवठा मिळणे बाबत त्यांचे प्रतिनिधी श्री. मुल्ला यांचेमार्फत सदरील अर्ज करण्यात आलेला आहे.

अर्जाची नोंद करुन वि.प. यांना म्हणणे देण्याची नोटीस काढण्यात आली. त्याप्रमाणे ता. २.२.२००९ रोजी वि.प.तर्फे म्हणणे देण्यात आले. त्या म्हणण्याप्रमाणे अर्जदाराचे विद्युत पुरवठ्यासाठी ३ पोल उभारणीचे व तारांचे जाळे टाकणे असे एकूण ०.१ कि.मी. एल.टी.चे काम आवश्यक होते. अर्जदाराने चाचणी अहवाल ता. ३०.९.२००८ रोजी सादर केला. परंतु जागेची पाहणी केली असता विद्युत संच मांडण्यात आला नव्हता तसेच मोटर बसविण्यात आली नव्हती. सबब त्याने फेर चाचणी अहवाल ता. १.११.२००८ रोजी सादर केला. तदनंतर जरुर ती कार्यवाही करुन अर्जदारास ता. ३१.१.२००९ रोजी विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. या बाबत सर्व कागदपत्रे वि.प.कडून दाखल करण्यात आलेली आहेत. सबब त्यांचे म्हणणे की, कृती मानकेचा भंग झाला नसलेने अर्ज फेटाळण्यात यावा.

या प्रकरणाची सुनावणी सांगली येथे ठेवण्यात आली. परंतु त्यावेळी अर्जदार स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी श्री. मुल्ला हजर झाले नाहीत. वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ हजर होते व त्यांनी त्यांची बाजू मंचापुढे मांडली.

या प्रकरणातील सर्व बाबींचा विचार करता, सकृतदर्शनी, अर्जदाराने दिलेला अर्ज यावर त्यांची सही नाही तसेच प्रतिज्ञा लेख दिलेला नसल्याने अर्ज मुलत: चुकीचा व बेकायदेशीर आहे. अशी तक्रार अर्जावर ग्राहकाची सही असणे नियमाप्रमाणे आवश्यक आहे. अर्जावर केवळ प्रतिनिधीची सही ही नियमाप्रमाणे अपेक्षित नाही.

वरील तांत्रिक बाबीचा विचार जरी केला नाही तरी देखील सदरच्या प्रकरणामध्ये अर्जदाराने पूर्वी ता. ३०.९.२००८ रोजी दिलेल्या चाचणी अहवाला प्रमाणे जागेची पाहणी केली असता, विद्युत संच बसविलेला नव्हता. सबब त्यांनी ता. १.११.२००८ रोजी फेर चाचणी अहवाल दिला आहे. सदर प्रकरणात ०.८ कि.मी. एल.टी. लाईन टाकण्याचे म्हणजे ३ पोल उभे करणे व तारांचे जाळे टाकण्याचे काम असल्याने अर्जानंतर ३ महिन्यांच्या कालावधी वि.प.स दिलेला आहे. वि.प.च्या म्हणण्याप्रमाणे व दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन ता. ३१.१.२००९ रोजी ग्राहकास विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे व त्या बाबत ग्राहकाच्या सहीची पावती घेण्यात आलेली आहे. परिणामी, कृती मानकेमध्ये दिलेल्या ३ महिन्यांच्या मुदतीत विद्युत पुरवठा करण्यात आला असल्याने कृती मानकेच्या तरतुदींचा भंग झालेला नाही. परिणामी, अर्ज फेटाळण क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश.

## आदेश

१) तक्रार अर्ज क्र. ०४/०९ फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १९.०५.२००९

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..